HGH INDIA® 2022
HOME DECOR ▪▪▪ GIFTS ▪▪▪ HOUSEWARE
July 12-15, 2022
INDIA EXPO CENTRE, GREATER NOIDA, DELHI NCR

NEWS 2

A TEXZONE Event
www.hghindia.com

Where business feels at home!

# अमर्याद नवकल्पना!

अमर्याद नवकल्पना! उत्पादने, डिझाइन, रंग आणि मटेरिअल्समध्येसुद्धा. होम टेक्सटाइल, होम डेकोर, होम फर्निचर, एरिया रग, फ्लोअर कव्हरिंग, हस्तशिल्प, आउटडोअर, हाउसवेअर, कुकवेअर, किचनवेअर आणि भेटवस्तू या सगळ्या विभागांमध्ये नवकल्पना पाहता येणार आहेत. एचजीएच इंडिया २०२२ च्या ११ व्या पर्वात अनेक नवीन संकल्पना समोर येणार आहेत. या नवकल्पनांमुळे व्यवसायांना नवी दिशा लाभेल.


स्पिन डेकोर


बेलाजिओ


युनायटेड एकता


बोहरा मार्केटिंग


एक्सेल वॉलकव्हरिंग


आद्यम हॅंडवूव्हन

होम फॅशन ट्रेंड्सवर लक्ष केंद्रीत करत, आघाडीचे डिझायनर, निर्यातदार, आंतरराष्ट्रीय पुरवठादार, आघाडीच्या निर्मिती केंद्रांमधील कुशल उत्पादक असलेल्या एचजीएच इंडिया २०२२ मध्ये नवीन स्रोत व नवीन मटेरिअल-बद्दलचा एक नवप्रवास असणार आहे.

आगामी दिवाळी व उत्सवी हंगामांसाठी ३०० नियमित प्रदर्शक त्यांची नवी कलेक्शन्स सादर करतील. त्याचप्रमाणे एचजीएच इंडियामध्ये १००हून अधिक नवे प्रदर्शक प्रथमच आपली श्रेणी दाखविणार आहेत. अभ्यागतांना नवकल्पना व सोर्सिंगमधील स्थैर्य यांची सांगड या ठिकाणी अनुभवता येणार आहे.

आघाडीच्या फर्निशिंग फॅब्रिक व होम टेक्स्टाइल ब्रॅंड्सनी प्रख्यात डिझायनर्ससोबत हातमिळविणी केली आहे किंवा प्रस्थापित आंतरराष्ट्रीय ब्रॅंड्सकडून लायसन्स मिळविली आहे. सुनीत वर्मा डेकोर व रुमोर्स, रितू कुमार होम व एफअँडएफ, नॉटिका व बिआंका आणि टॉइल इंडियन्स व एक्सेल वॉलपेपर्स यांनी भागीदारीने विकसित केलेली कलेक्शन्स एचजीएच इंडिया २०२२ मध्ये लॉंच करण्यात येणार आहेत. त्यांच्या स्टोअर प्रोफाइलमध्ये अशा प्रकारची प्रीमिअम डिझायनर लेबल्स व होम टेक्स्टाइल, फर्निशिंग व डेकोर ब्रॅंड्सची भर घालण्याची वैशिष्ट्यपूर्ण संधी ते उपलब्ध करून देणार आहेत. या व्यतिरिक्त प्रस्थापित फर्निशिंग कापड, अपहोल्स्टरी (आसनांवर लावण्यात येणारे कापड, पॅडिंग, स्प्रिंग्ज इ.), चामड्याच्या तसचे कृत्रिम चामड्याचे ब्रॅंड्स जसे रुमोर्स, एफ अँड एफ, जय दुर्गा, हरित इंडस्ट्रीज, असदीप फर्निशिंग, मार्व्हिन लेदर्स, क्लासिक लॅमिटेक्स, आणि टॉपलाइन रिटेलर्सना आपले नवीन कलेक्शन दाखवतील. मार्शल्स, एक्सेल होम डेकोर आणि विस्डमसारखे वॉलपेपर ब्रॅंड्ससुद्धा त्यांची नवी उत्पादने प्रदर्शित करतील.

बेड अँड बाथ आणि डेकोरेटिव्ह मेड-अप्स अभ्यागतांना ताजी नवीन रेंज सोर्स करता येईल. बुटिक लिव्हिंग, लेयर्स, स्प्रेड होम, पॅनो, प्रिमीअर फाइन लिनेन, के. जी. लिनेन, बिआंका, बेलाजियो, बेला कासा, लाकासा तुमच्यापर्यंत विविध प्रकारचे कापड, फिनिशेस, डिझाइन, प्रिंट्स आणि स्टाइल्स घेऊन येणार आहेत. ऑब्सेशन व श्रेनोसारखे ब्रॅंड्स त्यांची रग, बाथ ॲक्सेसरी, बाथ मॅट आणि डस्टबि-न्सची नवीकोरी श्रेणी सादर करणार आहे.

वीव्ह क्राफ्ट, सुप्रीम इंडस्ट्रीज, स्प्रेड होम, क्रिस्टल फर्निटेक, नोलाराम प्रथमच आउटडोअर आणि इनडोअर फर्निचर , लहान फर्निचर, किड्स फर्निटर आणि गृहपयोगी उपयुक्त वस्तू सादर करणार आहेत. फर्निशिंग रिटेलर्सकडून आपल्या ग्राहकांना उपलब्ध करून देण्याच्या वस्तूंची श्रेणी परिपूर्ण करण्यासाठी या वस्तूंची मागणी वाढलेली आहे.

विविध देशांमधील नावीन्यपूर्ण वॉलपेपर, ब्लाइंड्स, विंडो ऑटोमेशन, वॉल आणि टेबल डेकोर, आधुनिक लाइफस्टाइल व डेकोरेटिव्ह ॲक्सेसरी, लाकडी व सिन्थेटिक फ्लोअर कव्हरिंग, बेड व बाथ लिनेन, सजावटीसाठीचे मेड-अप्स विविध भारतीय आयातदारांकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

भारतामधून होम टेक्स्टाइलची समकालीन आणि पारंपरिक श्रेणी, डेकोरेटिव्ह मेड-अप्स, त्याचप्रमाणे जोधपूर, जयपूर, मुरादाबाद, फिरोझाबाद, खुर्जा, सहारणपूर, आग्रा, भदोही, जम्मू आणि काश्मीर आणि विविध इतर स्पेशलाइझ्ड सेंटरमधील शेकडो उत्पादकांची हस्तशिल्पे, रग, अपहोल्स्टर्ड फर्निचर (मऊ कापड लावलेले फर्निचर), वेताची व बांबूची उत्पादने, धातू, लाकूड, सिरॅमिक, काच, काथ्या, ज्यूट, रिसायकल केलेले मटेरिअल आणि विविध प्रकारच्या नैसर्गिक व मानवनिर्मित मटेरिअल या प्रदर्शनात पाहायला मिळणार आहेत.

हाउसवेअर कॅटेगरीमधील अनेक आघाडीचे ब्रॅंड रिटेल व्यवसाय, संस्थात्मक तसेच कॉर्पोरेट गिफ्टिंग मार्केटमध्ये त्यांचे नवीन कलेक्शन सादर करतील. उदा. स्टोरेज व हाउसवेअरमध्ये सेलो, सिग्नोरावेअर, रॉक्स, जेपी, एशियन, फ्रीलान्स, हेअर्स, प्लेसेरो, पिपल, हिअरविन, बोन्जूर; कुकवेअरमध्ये हॉकिन्स, विनोद, युनायटेड एकता, भलारिया, स्टाल, महाराजा, ओके, मेयरकिचनवेअरमध्ये ग्रेसी, रत्ना, रामसन्स; टेबलवेअरमध्ये एफएनएस, रामसन, कोरल, नाख्तमानक्ले क्राफ्ट, ल्युमिनार्क, पसबाचे, आयव्हिओ, सोनाकी, सुपरवेअर व डाइनवेल आणि विविध हाउसवेअर कॅटेगरीमधील इतर आयातदार, ब्रॅंड आणि उत्पादक त्यांच्या भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय कलेक्शनसह व्यापक सोर्सिंग सुविधा खुल्या करणार आहेत.

वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांची अपेक्षा ठेवत आणि स्पर्धेत पुढे राहण्याची गरज म्हणून भारतातील ५०० हून अधिक शहरे, तसेच २२ इतर देशांमधील हजारो रिटेलर्स, वितरक, घाऊक विक्रेत, भेटवस्तू पुरवठादार, संस्थात्मक व ट्रेड खरेदीदारांनी या प्रदर्शनाला भेट देण्यासाठी नोंदणी केली आहे. तुम्ही केली आहे का?

नवकल्पना ■ ट्रेंड्स ■ उत्पादने ■ स्रोत ■ संधी

HGH INDIA 2022 HOME DECOR GIFTS HOUSEWARE

## होम टेक्स्टाइल्स, होम डेकोर, हाउसवेअर आणि भेटवस्तूंचा आढावा घेता येणार

# एचजीएच इंडिया २०२२ मध्ये फर्निशिंग वेअर डिझायनर लुक

भारतातील प्रसिद्ध फॅशन डिझायनर रितू कुमार आणि सुनीत वर्मा घराला व्हायब्रंट, उच्च फॅशन कॅटेगरीमध्ये परीवर्तीत करण्यात आघाडीची भूमिका निभावत आहेत.

फर्निचरसाठीच्या कापडांपासून ते बेड कव्हर, उशांचे अभ्रे, पडदे, टेबल व किचनसाठीचे लिनेन ते टेबलवेअर आणि सजावटीसाठी असलेल्या ॲक्सेसरींपर्यंत प्रत्येक वस्तू रंगांचा, डिझाइनचा व मटेरिअलचा समन्वय साधून सादर केल्या आहेत. या वस्तू संपूर्ण लिव्हिंग रुम, बेडरुम किंवा डायनिंग रूमला एक परिपूर्ण व डिझायनर लुक देतील.



भातीय ग्राहक आपली पसंत व जाणीवा व्यक्त करण्याबद्दल अधिक जागरुक व सजग होत आहेत. त्यांना चांगली डिझाइन्स आकर्षित करतात. फर्निचरचे कापड, घरगुती वापरासाठीचे कापड, साजवटीच्या ॲक्सेसरीज, हाउसवेअर उत्पादने निवडताना उपयुक्ततेसोबतच घराची शोभा वाढविणाऱ्या वस्तूंकडे ग्राहकांचा कल आहे. विकसित जगताप्रमाणेच ही सर्व उत्पादने उपयुक्त वस्तूंपासून ही सर्व उत्पादने उपयुक्त वस्तूंपासून उत्तम डिझाइन, घरमालकाच्या व्यक्तिमत्वाला व आवडीनिवडींना साजेशी होण्यासाठी फॅशनल डिझायनर्सची भूमिका महत्त्वाची असणार आहे.

एचजीएच इंडिया २०२२ मध्ये या दिशेने एक उत्तम सुरुवात असणार आहे. कारण रितू कुमार आणि सुनीत वर्मासारखे फॅशनल डिझायनर्स त्यांचे पदार्पण करणार आहेत. रितू कुमार यांनी दिल्लीतील एफ अँड एफ या आघाडीच्या होम फर्निशिंग आणि डेकोर ब्रँडशी हातमिळवणी केली आहे. रितू कुमार होमतर्फे पूर्णपणे समन्वयाने तयार केलेले डिझायनर कलेक्शन दाखविण्यात येणार आहे. यात फर्निचरचे कापड, वॉलपेपर, बेड कव्हर, उशांचे अभ्रे, थ्रोज यासारखे डेकोरेटिव्ह मेड-अप, मेणबत्तीचे स्टँड, अरोमा (सुगंध), डिनरवेअर, कटलरी, ग्लासवेअर यासारखे टेबलवेअर यांचा समावेश आहे. या सर्व वस्तू परस्परपूरक आहेत. एफअँडएफचे भक्कम वितरण आणि मार्केटिंगमधील हातोटी व वाजवी किंमत यामुळे या सादरीकरणानंतर होम कॅटेगरीमधील डिझायनर, ब्रँड आणि रिटेलर यांच्यातील सहयोगात एक क्रांती घडून येणार आहे.

सुनीत वर्मा हे बंगळुरू येथील रुमोर्सच्या सहयोगाने तयार केलेले खास डिझाइन व तयार केलेले सुनीत वर्मा डेकोर फर्निशिंग फॅब्रिक कलेक्शन सादर करून आपला गृहप्रवास (होम जर्नी) सुरू करणार आहे. रुमोर्सला सर्व प्रकारच्या कापडामध्ये उच्च दर्जाच्या कापडाचे उत्पादन व निर्यातीचा दीर्घ अनुभव आहे. त्यांचा व्हर्टिलकली इंटिग्रेटेड (आपण करत असलेल्या उत्पादन निर्मितीची जबाबदारी स्वतःकडे असणे) कारखाना आहे. त्यामुळे अत्यंत गुंतागुंतीची आणि कल्पक डिझाइन तयार करणे शक्यत होते. सुनीत वर्मा आणि रुमोर्स यांची बलस्थाने एकत्र येऊन फर्निचरसाठीचे नवे कापड सादर करतील. १२ जुलैच्या संध्याकाळी एचजीएच इंडियातर्फे आयोजित नेटवर्किंग कॉकटेल आणि डिनरमधील फॅशन शोच्या माध्यमातून सुनीत वर्मा डेकोर कलेक्शन सादर करण्यात येईल. या ठिकाणी केवळ निमंत्रित रिटेलर्ससाठीच प्रवेश मर्यादित असेल.

---

## Indian heritage

HANDICRAFTS | KHADI | COIR | JUTE

## भारतीय वारसा





भारतातील हस्तकला, हातमाग, खादी, ज्यूट, काथ्या, बांबू क्षेत्रो ही डिझायनर, रिटेलर, ब्रँड्स आणि होम टेक्स्टाइल्स, होम डेकोर, रग, फर्निचर, हाउसवेअर आणि भेटवस्तू उत्पादनांसाठी वैशिष्यपूर्ण डिझाइन व मटेरिअलच्या शोधात असलेले डिझायनर, रिटेलर, ब्रँड्स आणि अशा प्रत्येकासाठी एक प्रकारचा खजिनाच आहे. वरील कॅटेगरींमध्ये भारतीय रिटेलरकडून भारतीय कारागीर व वीणकरांच्या अमर्याद क्षमतेचा फार उपयोग करून घेण्यात आलेला नाही आणि त्यांच्या दुकानांसाठी प्रीमिअम कलेक्शन तयार करण्याची ही मोठी संधी आहे.

२०१८ पासून एचजीएच इंडिया इंडियन हेरिटेज या ब्रँड अंतर्गत ही समृद्ध वारसा असलेल्या या उत्पादनांचा प्रसार करत आहे आणि भारतीय कारागीरांना भारतभरातील ५०० शहरे व नगरांमधील रिटेलर्स, इंटिरिअर डिझायनर्स आणि संस्थात्मक खरेदीदारांशी जोडून देत आहे. इंडियन हेरिटेजमध्ये (भारतीय वारसा) स्वतंत्र कंपन्या, असोसिएशन्स, निर्यात प्रसार कौन्सिल, सरकारी एजन्सी, विकास मंडळांचा सहभाग समाविष्ट आहे. थीम पॅव्हेलिअन व ट्रेंड्स पॅव्हेलिअनच्या माध्यमातून या उत्पादनांचा प्रचार-प्रसार केला जातो. या व्यतिरिक्त, एचजीएच इंडियातर्फे प्रायोजित इंडियन हेरिटेज पॅव्हेलिअनमध्ये राष्ट्रीय पुरस्कार विजेते कारागीर व वीणकरांकडून लाकडी कोरीवकाम, हँड पेंटिंग (चित्रकला), धातूवरील कोरीव काम, कुंभारकाम, नक्षीकाम, गालिचा विणणे आणि अशा अनेक प्रकारांचे थेट प्रात्यक्षित सादर करण्यात येते. या माध्यमातून अभ्यागतांना कलाकृतींमधील बारीक कलाकुसर व कौशल्य जाणून घेता येईल.

भारत सरकारचे कापड उद्योग मंत्रालय, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यो मंत्रालय, हस्तशिल्प विकास आयुक्त, हातमाग विकास आयुक्त आणि ईपीसीएच, एनडीसी, नेक्टर, एनएचडीसी, ईयूपीईए, आयआयसीटी, एपीएचडीसी, राष्ट्रीय ज्यूट महामंडळ, काथ्या महामंडळ या सारख्या संघटना त्यांच्या सदस्यांच्या व एसएमईंच्या माध्यमातून इंडियन हेरिटेज कला व शिल्पांचा छुपा खजिना एचजीएच २०२२ मध्ये पाहायला मिळणार आहे.

**11 वे वार्षिक पर्व : 12-15 जुलै 2022, इंडिया एक्स्पो सेंटर, ग्रेडर नोएडा, दिल्ली एनसीआर**

# रितू कुमार आणि एफअँडएफ हातमिळवणी





**रितू कुमार होमची संकल्पना कशी आली?**

५० वर्षांपूर्वी ब्रँडची स्थापना झाल्यापासून भारतीय कापड नव्याने शोधण्याची व त्याचे संवर्धन करण्याची रितू कुमार यांची तळमळ ही या ब्रँडची खासियत आहे. २०२० मध्ये पारंपारिक भारतीय कापड, आर्किटेक्चर आणि आकृतिबंध यांचा समकालीन वापर करत रितू कुमार होमची स्थापना झाली. यात बेड लिनेन, वॉलपेपर, टेबलवेअर आणि होमवेअर डेकोर समाविष्ट आहे. या हंगामातील कलेक्शनमध्ये घरातील उबदार कोपऱ्यासाठी बहुमुखी आणि आधुनिक कलाकृतींचा समावेश आहे आणि या वस्तूंमध्ये भारतीय कलाकुसर खोलवर रुजलेली दिसून येते.

**ब्रँडची विचारसरणी**

रितू कुमार होम घरांसाठी आरामदायी लक्झरी निश्चित करते. त्यांच्या डिझाइन्सच्या माध्यमातून घरे व्यक्त होतात. व्हिंटेज लेन्समधून निवांत उन्हाळी दिवसांच्या आठवणींना उजाळा मिळतो, हिवाळ्यातील मंद रात्री दिसू लागतात आणि कोलकात्याच्या रस्त्यावर फुरसतीने मारलेला फेरफटका आठवतो. याची सांगता बहुधा व्हिक्टोरिया मेमोरिअलपाशी होते. त्या निवांत जागेवर अनुभवलेल्या पावसाळी दिवसांची आणि प्रातःकाळाची आठवण करून देते, जे आजकालच्या धकाधकीच्या जीवनात अनुभवणे कठीण आहे.

**सहयोग**

एफअँडएफ या होम टेक्स्टाइल्स व फर्निशिंगमधील आघाडीच्या ब्रँड व वितरकाने रितू कुमारसोबतच्या त्यांच्या नात्याविषयी सांगितले, " फर्निशिंगचे कापड, वॉलपेपर, बेडिंग आणि क्रॉकरीची नवी श्रेणी सादर करण्यासाठी रितू कुमार या प्रसिद्ध फॅशन ब्रँडसोबत सहयोग केल्याचा आम्हाला अभिमान आहे. दोन वर्षांहून अधिक काळ चर्चा, कल्पना, विचारविनिमय केल्यानंतर या दोन ब्रँड्सनी हातमिळविणी करण्याचा आणि होम इंटिरिअर उत्पादनांमध्ये खास श्रेणी सादर करण्यासाठी काम करण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी, बारकाव्यांवर बारीक लक्ष देणारी रितू कुमारची कल्पक डिझाइन संवेदनशीलता आणि एफअँडएफचे सखोल तांत्रिक उत्पादन ज्ञान व भारतातील वितरणाचे अनेक वर्षांचे कौशल्य यांचे एकत्रीकरण झाले आहे. या सहयोगासह दोन्ही ब्रँड्सचे पारंपरिक भारतीय सौंदर्यशास्त्र साजरे करण्याचे आणि अधिक वाजवी किमतीत लक्झरिअस इंटिरिअरसाठी नव्या संधी निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे."

रितू कुमारच्या दृष्टिकोनातून, एफअँडएफशी सहयोग केल्याने आतापर्यंत न पोहोचता आलेल्या ग्राहकांपर्यंत हा ब्रँड पोहोचण्यास आणि बेडशीट्स व अपहोलस्टरीची श्रेणी सादर करून आपले अस्तित्व विस्तारण्यासाठी मदत करेल.

**रितू कुमार होम कलेक्शन्स**

प्रत्येक कलक्शन ही एतद्देशीय कला प्रकाराला दिलेली मानवंदना आहे आणि बहुतेक कलेक्शन्स ही विविध भागांमधून आहेत तर काही कलेक्शन्स ही अधिक समकालीन करण्यासाठी दोन किंवा अधिक भागांतील कलाप्रकारांचे मिश्रण करण्यात आले आहे. म्युझिअम दर्जाच्या इंडियन टेक्स्टाइल्समधून संशोधन केलेली आणि पुन्हा तयार केलेले रितू कुमार कलेक्शन अनेक प्रकारांच्या कापडांपासून प्रेरणा घेऊन तयार केलेले आहे. नवाबांचे शहर असलेल्या काश्मीरमधील जमावर शालींच्या घराण्यापासून ते लखनऊमधील हवेल्यांमधील जाळ्या, मासुलीपटणमची नाजूक कलाकुसर आणि झाडे व प्राण्यांचे छाप यांचा उपयोग करणाऱ्या आणि कधीही जुनी न होणाऱ्या कलमकारीपर्यंत या प्रेरणा घेतल्या आहेत. संगानेर आणि राजस्थानच्या बागरू घराण्यातील भांडाराचेही संशोधन आणि पुनर्निर्मिती करण्यात आली आहे.

रितू कुमार होमचे पोत आणि रंग हे इंद्रिये सुखावतात. तडा गेलेल्या पांढऱ्या पोर्सेलीनच्या टोनपासून, मेरिगोल्ड येतो, डस्टी रोझ आणि मेहेंदी ते मीनाकारी दागिन्यांचे टोन्स यात समाविष्ट आहेत. हे रंग ग्रामीण, सेंद्रिय आहेत आणि भाज्यांपासून केलेल्या डायच्या बेसपासून प्रेरणा घेतली आहे.

रितू कुमार होमतर्फे एफअँडएफ च्या सहयोगाने एचजीएच इंडिया २२ मध्ये लाँच करण्यात येणारे उत्तमा कलेक्शन अभ्यागतांना वेलबट्टीदार कापड आणि भरतकाम केलेले पडदे असलेल्या मोगलकालीन खोल्यांमध्ये आणि तंबूंमध्ये घेऊन जाणार आहेत. फुलांच्या बट्ट्या व भरतकाम, बेड लिनेन, क्विल्ट्स आणि उशा तयार करताना या मोगल सौंदर्यशास्त्र आणि शतकाहून जुन्हा असलेल्या ब्लॉक प्रिंट्सपासून प्रेरणा घेण्यात आली आहे. हे कलेक्शन लक्झरी व आरामदायीपणाचे द्योतक आहे आणि ते प्लश कॉटन ब्लेंड्स जसे की सॅटिन, व्हॉइल आणि टेक्श्चर्ड कॉटनपासून तयार केले आहे.

उत्तमा कलेक्शनचे खरे सौंदर्य यात आहे की, क्रॉकरी, बेडिंग, उशा आणि टेबल लिनेनसारख्या उत्पादन कॅटेगरींमध्ये डिझाइन आणि रंग अखंडपणे वाहतात आणि रितू कुमारसारख्या डिझायनर लेबलसाठी अत्यंत वाजवी किमतीत संपूर्ण कलेक्शन किंवा स्वतंत्र वस्तूंचा पर्याय निवडता येतो. रिटेलर्सना आपले दुकान डिझायनर युगात अपग्रेड करण्यासाठी ही मोठी संधी आहे.

**रितू कुमार:**

## भारतीय फॅशनची उद्गाती



रितू कुमार यांनी १९६० मध्ये लेडी आयर्विन महाविद्यालयातून कला इतिहासाच्या विद्यार्थी म्हणून प्रवास सुरू केला. कोलकातामध्ये म्युझिओलॉजी शिकताना त्या पश्चिम बंगालमधील सिंगापोर या छोट्याशा गावी गेल्या. तिथे असताना त्यांना बेरोजगार झालेले हँड ब्लॉक प्रिंटर्सची (कापडावर छाप उमटविण्याचे काम करणारे कारागीर) एक वसाहत त्यांना आढळली. त्यांनी एक छोटासा व्यवसाय सुरू केला. त्यांनी त्या प्रिंटर्सना काही डिझाइन्स देऊ केल्या. या प्रयत्नांची परिणती सुंदर हँड ब्लॉक प्रिंटेड साड्यांमध्ये झाली. कोलकातामध्ये दोन प्रदर्शने केल्यानंतर त्यांची डिझाइन्स भारत व आंतरराष्ट्रीय पातळीवर लोकप्रिय व्हायला फार वेळ लागला नाही.

१९९० च्या दशकात जेव्हा भारताने उदारीकरण स्वीकारून आपली अर्थव्यवस्था जगासाठी खुली केली तेव्हा रितू कुमारची मिस इंडिया विजेत्यांची डिझायनर म्हणून नियुक्ती झाली. या प्रमुख मार्गाने भारताचे आंतरराष्ट्रीय सौंदर्य व फॅशन रंगमंचावर पदार्पण झाले.

जगभरात भारतातील सर्वात मोठी व अत्यंत प्रतिष्ठित डिझायनर असलेल्या रितू कुमार यांना फॅशनल, टेक्स्टाइल व कारागिरीच्या क्षेत्रात योगदान दिल्याबद्दल २०१३ मध्ये भारतातील चौथ्या क्रमांकाचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. २००८ मध्ये त्यांना फ्रान्स सरकारच्या शेव्हालिए देस आर्ट्स एट देस लेट्रेस या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आता रितू कुमार यांना एक उद्योग साम्राज्य उभे केले आहे जे जगभर पसरलेले आहे. रितू कुमार यांना विरंगुळा म्हणून पेंटिंग करायला आवडते आणि त्यांच्या कलेक्शनसाठी प्रेरणा देणाऱ्या कापडाच्या इतिहास शोधण्यासाठी पर्यटन करण्याची त्यांना आवड आहे.

# सुनीत वर्मा आणि रुमोर्स होम स्पेसमध्ये एकत्र

आधुनिक होम टेक्स्टाइल्समध्ये एक दशकाहून अधिक काळ टेक्स्टाइल व भरतकामामध्ये काम करण्या सुनीत वर्मांच्या डिझाइन तत्वाने आता एक वर्तुळ पूर्ण केले आहे. "चांगले डिझाइन वैश्विक असते आणि त्याला कालमर्यादा नसते.", असे सुनीत वर्मा यांनी एचजीएच इंडियाला दिलेल्या एक्सक्लुझिव्ह मुलाखतीत सांगितले. या मुलाखतीत सुनीत वर्मा यांनी होम स्पेसमध्ये त्यांच्या पदार्पणाबद्दल, रुमोर्स या आघाडीच्या फर्निशिंग ब्रँडसोबत केलेला सहयोग आणि रुमोर्ससोबत सहयोग करून त्यांच्या डिझायनर केल्कशनसाठी एचजीएच इंडिया हा लॉंच प्लॅटफॉर्म याबद्दल त्यांनी आपले मनोगत व्यक्त केल. त्या मुलाखतीतील काही अंश येथे देत आहोत





**तुम्ही होम स्पेसमध्ये पदार्पण का करत आहात?**

मी होम स्पेसमध्ये पदार्पण करत आहे कारण मी इंटिरिअरबद्दल कायम रोमांचित होतो आणि सुंदर कापड हे माझे पहिले प्रेम आहे. म्हणून, सुंदर कापडाबद्दलचे माझे प्रेम आणि लक्षणीय जाग यांची सागड घालू शकतो तर हे माझ्यासाठी एक नवे व्हेंचर आहे आणि ते खूप रोमांचक आहे.

**रुमोर्स टीमसोबत तुमची भागीदारी**

ॲसेंट डेकोरसोबत सहयोग करताना मी प्रचंड उत्साहात आहे कारण ते भविष्याच्या दृष्टीने विचार करणारे आहेत, प्रोफेशनल आहेत, भारतभर आणि जगभरात ते पोहोचले आहेत आणि मला त्यांच्यासोबत काम करताना आनंद मिळतो. सहयोग करण्यासाठी ही खूपच रोमांचक तरुण टीम आहे.

**एचजीएच इंडियामधील तुमचा सहभाग**

एचजीएच इंडिया ही देशातील एक उत्तम टेक्स्टाइल फेअर (कापड प्रदर्शन) आहे आणि त्यात सहभागी होणे माझ्यासाठी अत्यंत रोमांचक आहे आणि हा माझ्यासाठी बहुमान आहे. त्यांची ग्राहकांच्या प्रोफाइलच्या बाबतीत त्यांची व्याप्ती खूप आहे. हजारो लोक म्हणजे आघाडीच्या रिटेलर्सपासून छोट्या शहरांमधील लोक, मोक्याच्या ठिकाणी असलेली दुकाने, घाऊक विक्रेत्यांपर्यंत सर्व जण या प्रदर्शनात येतात. या प्रदर्शनाच्या माध्यमातून तुम्ही विविध लोकांपर्यंत पोहोचू शकता आणि आमच्या सहयोगाचा लॉंच करण्यासाठी हे एक परिपूर्ण व्यासपीठ आहे.

**तुमची नवीन लाईन आणि रुमोर्ससोबतच्या सहयोगातून ग्राहक कसली अपेक्षा करू शकतात**

रुमोर्ससाठी फॉरएव्हर-मोअर होम फर्निशिंग कलेक्शन लक्झरिअस आहे आणि वधूच्या व नवदांपत्यासाठी खास तयार केले आहे. फ्रेंच बरोक कालखंड आणि कॉचर टेक्स्टाइल्सपासून याची प्रेरणा घेतली आहे आणि त्याचा पोत, रुपचिन्हे आणि नक्षीकाम समृद्ध आहे. कलर पॅलेट सॉफ्ट, पेस्टल आणि ओल्ड-वर्ल्डमधील आहे. कालातीत आकर्षण आणि रोमॅंटिसिझममधून फॉरएव्हरमोअरची भावना निर्माण होते.

**रुमोर्ससाठी सुनीट वर्मा यांचे टेरेन**

हे अर्बन होम कलेक्शन असून जीवनाच्या पाच घटकांपासून प्रेरणा घेऊन ते तयार केले आहे. नैसर्गिक पोत, शुद्ध जीवन आणि समकालीन सौंदर्यस्थळे या कलेक्शनमध्ये आहेत. निसर्ग व ५ घटकांच्या नैसर्गिक आकृतीबंधांमधून ही रंगसंगती प्रेरित आहे. पॅटर्न, पोत आणि भरतकाम या आकृतीबंधांना पूरक आहे.

**भविष्यातील योजना आणि दीर्घकालीन ध्येय**

ॲसेंट डेकोरसह विलक्षण ब्रँड तयार करणे हीच भविष्यातील योजना आहे. हा ब्रँड फक्त टेक्स्टाइल्सचा नव्हे तर उशांच्या अभ्र्यांचे मेड-अप्स, अपहोल्स्टरी, ड्रेपरीच्या विभागातही हा ब्रँड निर्माण करायचा आहे आणि विस्तारण्यासाठी हे अमर्यादित क्षेत्र आहे. ही लाइन भारतात, परदेशात सादर करण्यात येईल आणि यातून अप्रतिम कलाकृती आणि उत्तम व्यवसाय निर्माण करता येईल.

## सुनीत वर्मा - डिझाइनसाठी पॅशन

सुनीत वर्मा हे भारतातील आघाडीचे कॉटरिअर (ग्राहकाच्या गरजेनुसार कपडे शिवून विकणारे) आहेत. ग्लॅमर आणि कालातीत स्टाईल ही त्यांची ओळख आहे. युरोपमधून १९८६ मध्ये पदवी प्राप्त केल्यानंतर पॅरिसमध्ये प्रख्यात इव्ह सेंट लॉरेंटमध्ये काम करण्यास गेले. अत्यंत काटेकोर कलाकुसर, डिझाइनची पक्की समज आणि शिवणकाम संशोधनाबद्दल असलेले प्रेम असलेला वर्मा ब्रँड आजच्या युगातील स्त्रियांसाठी कल्पना, सुसंस्कृतपणा आणि स्त्रीत्व झळकते.

काही प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय ब्रँड्ससोबत असलेल्या सहयोगामुळे ते एकमितीय प्रोफाइल असलेल्या डिझायनरपलिकडे कार्यक्षेत्र असलेले ते डिझायनर आहेत. सुनीत हे दागिने जडविलेल्या हॅंडबॅग्जचा जगातील सर्वात प्रसिद्ध असलेला लक्झरी ब्रँड ज्युडिथ लिबरसह असलेले एकमेव आंतरराष्ट्रीय डिझायनर आहेत. त्यांनी जगभरात प्रचंड यश संपादन केले आहे आणि प्रशंसा प्राप्त केली आहे. लॉस एंजेलिस, मियामी, पॅरिस, टोकियो, त्याचप्रमाणे लंडनमधील हॅरॉड्स व न्यूयॉर्कमधील बर्गडॉर्फ गुडमनमधील ज्युडिथ लिबर बुटिकमध्ये सुनीत वर्मा फॉर ज्युडिथ लिबर्स मिनॉडिअर्सची विक्री होते. प्रत्येक हंगामामध्ये त्यांते कलेक्शन पॅरिसमधील व्हॅंडम फेअरमध्ये सादर करण्यात येते. त्यांच्या सिग्नेचर बॅग्ज सेक्स अँड द सिटी स्टार सारा जेसिका पार्कर आणि हॉलिवूड सेलेब्रिटी मारिया कॅरे आणि जेनिफर लोपेझ वापरतात. त्याचप्रमाणे त्यांनी डिझाइन केलेल्या बॅग्ज ऐश्वर्या राय, प्रियांका चोप्रा, कंगना रानौट आणि प्रीती झिंटा या बॉलिवूडमधील आघाडीच्या अभिनेत्री वापरतात आणि त्या आंतरराष्ट्रीय व भारतीय रेड कार्पेटवर सादर करण्यात आल्या आहेत.



सुनीत वर्मा हे २००७ पासून आतापर्यंत बीएमडब्ल्यू मोटर्सशी संलग्न आहेत. ते बीएमडब्ल्यूचे सर्व कार लॉंचेस आणि बीएमडब्ल्यू वर्धापन दिन आयोजित करतात. त्यांनी फॅशन ॲप्रिसिएशन संध्या ही संकल्पना साकार केली आहे. ते सध्या बीएमडब्ल्यूसह भारताच्या १५ शहरांच्या दौऱ्यावर आहेत आणि ते ब्रँडसाठी सातत्याने नवनवीन कल्पना विकसित करत आहेत. गेल्या दशकभरात सुनीत वर्मा यांनी कपडे व इंटिरिअर प्रकल्पांसाठी स्वारोस्कीमध्ये आंतरराष्ट्रीय डिझायनर्ससोबत काम केले आहे.

दिल्ली आणि मुंबईमध्ये ते एक्सक्लुझिव्ह विक्री करत असून दिल्ली, मुंबई, दुबई, चेन्नई, बंगळुरू आणि चंदिगडमधील विविध मल्टि-डिझायनर स्टोअर्समध्ये सुनीत वर्मा कलेक्शन उपलब्ध आहेत. दावोसमधील व्यावसायिक समुदायासाठी त्यांचे कलेक्शन सादर करण्यासाठी त्यांना द वर्ल्ड इकोनॉमिक फोरममध्ये निमंत्रित करण्यात आले होते.

सुनीत यांची कला भारतात व जगात लोकप्रिय आहे. एनवायसीमधील बॉलिवूड फॅशन कौन्सिलने त्यांना अनेकदा डिझायनर ऑफ द इयर परुस्काराने सन्मानित केले आहे. सल्लागार डिझायनर म्हणून सुनीत वर्मा यांनी युरोप व अमेरिकेतील अनेक डिझाइन हाउससाठी डिझाइन विकसित केली आहेत. यात डॉना कॅरन, कॅल्व्हिन क्लीन, कॅरोलिना हरेरा आणि निकोल मिलर यांचा समावेश आहे. त्यांनी तयार केलेल्या बॅग्ज व स्कार्फ सारख्या ॲक्सेसरी न्यूयॉर्कमधील मेट्रोपोलिटन गिफ्ट शॉप आणि देशभरात विकली जातात.

सुनीत वर्मा यांना त्यांचे कलेक्शन सादर करण्यासाठी २००५ मध्ये मिलान व रोम फॅशन वीकमध्ये निमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी लंडन, पॅरिस, न्यूयॉर्क, हॉंगकॉंग, इंडोनेशिया, बर्लिन, लॉसएंजेलिस या ठिकाणी शो सादर केले आहेत. भरतातील कापड उद्योगासोबत काम करण्यासाठी आणि बनारस व दक्षिण भारतातील हातमागांना पुनरुज्जीवित करण्यासाठी भारत सरकारतर्फे सुनीत यांची अनेकदा नियुक्ती करण्यात आली आहे.